जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाकरीता खाजगी वाहन पुरवठादारांकडून घेण्यात येणाऱ्या वाहनांचे दर करार निश्चित करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. डिव्हीसी-१०१७/प्र.क्र.६५/३१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -०६ ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ:- १) शासन पत्र क्र. GADP-३१०२(३६)/१/२०१३, दिनांक १९.०९.२०१४.
२) जिल्हाधिकारी, नाशिक यांचे पत्र क्र.कक्ष ६/५/अदौ-८०/२०१७, दिनांक २९.०७.२०१७.

**प्रस्तावना:-**

राज्यात येणाऱ्या राज्य अतिथी / मान्यवर यांच्या परिवहनाकरीता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या अधिनस्त डि.व्ही. वाहने ठेवण्यात आली आहेत. तथापि जिल्ह्याच्या ठिकाणी एकाच वेळी अनेक मान्यवर भेटीसाठी आल्यास व डि.व्ही. वाहने अपुरी पडल्यास खाजगी वाहन पुरवठादारांकडून भाड्याने वाहन उपलब्ध करुन घेण्याबाबत दरकरार करण्यात येतो. जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाकडील यापूर्वीचा दरकरार संपूष्टात आल्याने, भाडेतत्वावर वाहने घेण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयामार्फत ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली होती. सदर ई-निविदा प्रक्रीयेनंतर नाशिक जिल्हयासाठी सदरहू ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरास मान्यता देण्याची व या दराने जे खाजगी वाहन पुरवठादार वाहने पुरविण्यास तयार असतील त्या पुरवठादारांना शासन मान्य पुरवठादार म्हणून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाकरीता नाशिक जिल्ह्यास भेट देणाऱ्या सन्माननीय अतिथी व मान्यवरांच्या परिवहन व्यवस्थेसाठी शासकीय डि.व्ही. वाहने उपलब्ध नसताना खाजगी वाहन पुरवठादारांकडून भाड्याने वाहने पुरविण्याबाबत ई-निविदा प्रक्रीयेमध्ये प्राप्त झालेल्या निम्नतम दरपत्रकास ( सोबतचे विवरणपत्र-अ) शासनाची मान्यता देण्यात येत आहे. या दराने तसेच निविदेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून खालील पुरवठादारांकडून वाहने उपलब्ध करुन घेण्यासही या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहन पुरवठादाराचे नाव व पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| १. | **मे. गणेश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक.**<br>शॉप नं.०१, रजनी प्रभात अपार्टमेंट, मुंबई-आग्रा हायवे, अश्विनीनगर, नाशिक-०९. | **क्र.** ०२५३ -२३७२७२७/२३८४७०६<br>**मो.** ९८९०२२५८३५ |
| २. | **मे. कोकीळा टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक.**<br>प्लॉट क्र. १२, सिंगापूर गार्डन, टाकळी रोड, द्वारका, नाशिक-४२२ ०११. | **क्र.** ०२५३- २५०००० २<br>**मो.** ९५५२२५२९६० |

२. खाजगी पुरवठादाराकडून भाड्याने वाहने घेण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, नाशिक यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. निविदा सुचनांमधील अटी व शर्तींच्या अधिन राहून सोबतच्या विवरणपत्रातील दर मान्य असलेल्या उपरोक्त पुरवठादारांचे नाशिक जिल्ह्याकरीता पॅनेल तयार करण्यात यावे व वाहन पुरवठ्याबाबतचा आवश्यक तो दरकरार तात्काळ करुन घेण्यात यावा. तसेच निविदेतील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होईल असे पहावे.

२. सदर दरकरार **दिनांक ०१.०९.२०१७ ते ३१.०८.२०१९ या दोन वर्षाच्या** कालावधीसाठी लागू राहील.

३. सदर दर करारामध्ये कोणतेही बदल वा सुधारणा करण्याचे अधिकार अंतिमत: शासनाचे राहतील.

४. खाजगी वाहने भाड्याने उपलब्ध करुन घ्यावयाची झाल्यास जिल्हाधिकारी, नाशिक यांनी वरील शासनमान्य पुरवठादारांकडूनच वाहने उपलब्ध करुन घ्यावीत. मे. गणेश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक या पुरवठादाराचे दर निम्नतम असल्याने प्राथम्याने कामे देण्याबाबत त्यांना विचारणा करण्यात यावी.

५. वाहन पुरवठा केल्यानंतर त्याबाबतची देयके पुरवठादारांना ३ महिन्याच्या आत अदा करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी वाहने भाड्याने घेतल्यानंतर जिल्हाधिकारी, नाशिक यांनी वाहन पुरवठ्याबाबतची देयके तात्काळ प्राप्त करुन घेऊन ती आपल्या शिफारशीसह ३० दिवसाच्या आत न चुकता शासनास सादर करावीत.

६. संबंधित पुरवठादारांनी वाहनाचा पुरवठा केल्यानंतर त्याबाबतचे देयके तात्काळ जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर करावीत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१००६१५१०१४८६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=203af2dfba7db2a4824298a34f2c9294f93396f53d7f87cd4d69fecf5cf7005f, serialNumber=9246b8ccd2e2cb10707678d45ea1ad26cc1e4d7bff7bd2aa1f253a716b8c448b, cn=Arvind Bhimrao More
Date: 2017.10.06 17:02:42 +05'30'

(अ.भि.मोरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**सहपत्र:- विवरणपत्र "अ"**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, नाशिक,
२. जिल्हाधिकारी, नाशिक.
३. उप सचिव (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग.
४. सामान्य प्रशासन विभाग/का.२५, मंत्रालय, मुंबई.

५. वित्त विभाग/व्यय-४, मंत्रालय, मुंबई.
६. मे. गणेश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक.शॉप नं.०१, रजनी प्रभात अपार्टमेंट, मुंबई-आग्रा हायवे, अश्विनीनगर, नाशिक-०९.
७. मे. कोकीळा टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, नाशिक,प्लॉट क्र. १२, सिंगापूर गार्डन, टाकळी रोड, द्वारका, नाशिक-४२२ ०११.
८. निवडनस्ती.

शासन निर्णय क्र.डिव्हीसी-१०१७/प्र.क्र.६५/३१, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ सोबतचे विवरणपत्र - अ

| जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाकरीता खाजगी वाहन पुरवठादाराकडून घ्यावयाच्या निम्नतम दराचा तक्ता (सर्व कराव्यतिरीक्त) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाहन | ८Hr. ८०KM | १२ Hr. १२० km | २४ Hr. २४० km | After ०८/१२/२४ Extra Hrs | After ८०/१२०/२४० Extra Kms | ५ Days १२०० KM | For १ Month |
| स्विफ्ट डिझायर | १,४७५ | २,३८० | ४,६०० | ८०.०० | १४.५० | २१२५० | ४८,००० |
| टाटा इंडीगो | १,४५० | २,३७० | ४,४०० | ८०.०० | १४.०० | २१२५० | ४७,५०० |
| करोला अल्टीस | ३,००० | ३,५९० | ८,९०० | १३०.०० | २८.०० | ४९००० | ४९,५०० |
| होंडा सिव्हीक | २,९७५ | ३,६०० | ८,९५० | १३०.०० | २७.०० | ६२००० | ९०,००० |
| होंडा सिटी | २,३०० | ३,५७० | ५,६०० | १२०.०० | २३.०० | ३१००० | ७४,५०० |
| टोयोटा इनोव्हा | २,१९० | ३,३३० | ४,८५० | १७०.०० | १५.७५ | २४१०० | ६९,५०० |
| होंडा ॲकॉर्ड | ३,००० | ३,६०० | ८,७०० | २२०.०० | ३०.०० | ७९००० | ८९,००० |
| मर्सिडीज बेंझ | १३,००० | १७,९५० | २९,९०० | १४०.०० | ९०.०० | १८०००० | Nil |
| मिनी बस १५ सिटर | १४,८०० | १८,००० | २२,००० | ३६०.०० | ६४.०० | ११०००० | Nil |
| मिनी बस २० सिटर | १७,००० | २३,५०० | ३२,५०० | ९५०.०० | ८५.०० | १४०००० | Nil |

Arvind Bhimrao More

Digitally signed by Arvind Bhimrao More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=203af2dfba7db2a4824298a34f2c9294f93396f53d7f87cd4d69fecf5cf7005f, serialNumber=9246b8ccd2e2cb10707678d45ea1ad26cc1e4d7bff7bd2aa1f253a716b8c448b, cn=Arvind Bhimrao More
Date: 2017.10.06 17:02:58 +05'30'

(अ.भि.मोरे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन